महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७७ वे | दिनांक : २२/०६/२०२६ | वार : सोमवार

## खासदार ओमराजे निंबाळकर 'एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात काम करणार', पत्रकार परिषद घेत भूमिका जाहीर -



**धाराशिव** : खासदार ओमराजे निंबाळकर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. आज ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची बैठक घेतली. यात ओमराजेंनी एकनाथ शिंदे यांचे कौतुक केले. तसेच मी जो निर्णय घेत आहे तो सर्वांना मान्य असावा, असेही त्यांनी कार्यकर्त्यांच्या सोबत झालेल्या बैठकीत म्हटले होते. त्यानंतर पत्रकार परिषद घेत त्यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे.

ओमराजे निंबाळकर म्हणाले, आज मी आल्यापासून धाराशिव लोकसभा मतदारसंघातील माझ्या लोकांना विनंती केली होती की इथे उपस्थित राहावे. माझ्या आवाहनाला प्रतिसाद देत माझ्या लोकसभा कार्यक्षेत्रातील जिवाभावाची लोक उपस्थित होती. सगळ्यांशी चर्चा केली आणि सगळ्यांचे मत जाणून घेतले. ही सगळी मत जाणून घेतल्यानंतर सगळ्या कार्यकर्त्यांच्या ज्या सूचना आहेत, मला जरा पार्श्वभूमी सांगायची आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सगळे कार्यकर्ते लढत असताना सुद्धा धाराशिव मतदारसंघाचा विचार केला तर पालिकेत आम्हाला यश मिळू शकले नाही. मी असेल, आमचे सगळे सहकारी असतील आम्ही 24 तास सर्वसामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी दिले आहेत.

पुढे बोलताना ओमराजे निंबाळकर म्हणाले, आम्ही कामात कधी कमी पडलो नाही. पण दुर्दैवाने सत्तेमुळे आम्हाला या पराभवाला सामोरे जावे लागले. मला अतिशय प्रामाणिकपणे सांगायचे आहे की सामान्य माणसाचे प्रतिनिधी म्हणून आम्ही इथे आहोत. आज सगळ्यांचे माध्यमातून त्या ठिकाणी निर्णय घेतला आहे की शिवसेना पक्षात आम्ही जाणार आहोत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही काम करणार आहोत.


आपण बघितले असेल ज्या कारणामुळे मी माझे सार्वजनिक जीवन सुरू केले, की या वाईट वृत्तीची लोक राजकारणाच्या पटलावर राहिली नाही पाहिजेत. ती भूमिका मी चोखपणे पार पाडत आलो. महाराष्ट्र पोलिस जे तपास करत आहे ते दबावाखाली करत आहे, असे आम्हाला वाटले आणि याची चौकशी सीबीआयकडून करण्यात यावी अशी याचिका आम्ही हायकोर्टात केल्यानंतर या हत्याकांडाचा तपास सीबीआयकडे वर्ग झाला. 20 वर्ष ही प्रक्रिया चालली. निकाल आपल्या बाजूने येईल अशी अपेक्षा होती. पण कोर्ट म्हणत आहे की राजकीय वैमनस्य होते, ते मान्य करत आहे. कुठल्याही हत्याकांडात उद्देश महत्त्वाचा असतो तेही कोर्ट मान्य करत आहे. पण दुर्दैवाने कळंबोली पोलिस स्टेशनच्या तपासाला पेस्ट करून जो निकाल आला तो अतिशय दुर्दैवी आला.

ओमराजे निंबाळकर म्हणाले, यात एक माणूस त्यात सक्षमपणे पाठीशी उभा होता आणि त्यांनाही ते पटले नव्हते. निकाल आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे साहेब यांच्याशी माझे बोलणे झाले, त्यांनी अमित शहा यांच्याशी देखील माझे बोलणे करून दिले. आम्ही त्यांना इतकीच विनंती केली आम्हाला कोणाचा फेवर नकोय, पण आम्ही जो संघर्ष मागच्या 20 वर्षांपासून करत आहोत, न्याय मागत आहोत आणि तो न्याय आम्हाला मिळाला पाहिजे, अशी मागणी केली. त्यानंतर स्वतः एकनाथ शिंदे यांनी समोर येऊन स्टेटमेंट दिले होते आणि सीबीआय त्या ठिकाणी हायकोर्टात अपील दाखल करणार आहे.

पुढे बोलताना ओमराजे निंबाळकर म्हणाले, कुठलाही पक्ष असला तरी अशा वृत्तीला राजकारणातून थांबवण्यासाठी जे काही करावे लागणार आहे त्यासाठी ओमराजे कधीच थांबणार नाही आणि मला कोणी रोखूही शकत नाही. आज सत्तेची ताकद घेऊन त्याठिकाणी आमच्यासारख्या सामान्य माणसावर जो अन्याय होत आहे, लोकांना अडवले जात आहे. खासदारांनी हे काम करावे, ट्रान्सफॉर्मर द्यावे, अशी अपेक्षा असतात. आता 7 वर्ष होत आले आहेत. त्या माणसाच्या अपेक्षा फार मोठ्या आहेत. या सगळ्या अपेक्षांना न्याय देण्याचे काम मी इथून पुढे करत राहील. सामान्य माणूस ओमराजेला ओळखतय. त्या सामान्य माणसांसाठी मी काय काम करतो हे त्यांनी पाहिले आहे. कुठल्या पैशांसाठी किंवा हव्यासासाठी, पदासाठी जाणारा ओमराजे नाही.

ओमराजे निंबाळकर म्हणाले, माझ्याकडे मोठे प्रस्थापित माणसं कोणी नाही, माझ्याकडे सर्वसामान्य माणसं आहेत. मी त्या लोकांसाठी काम करत राहील. हे वचन मी तुम्हाला देत आहे. माझा असा कोणता वेगळा व्यवसाय सुरू आहे आणि त्याला संरक्षण मिळवण्यासाठी मी तिकडे जात आहे, असे अजिबात नाही. माझ्यावर काही ईडी सीबीआयची धाड पडली असेही काही नाही. मी सर्वसामान्य लोकांसाठी काम करणारा माणूस आहे. या सत्तेचा उपयोग कशाप्रकारे केला जाऊ शकतो हे निश्चितपणे आम्ही धाराशिवच्या लोकांना दाखवून देऊ. आदरणीय उद्धवजी, आदित्यजी, बाळासाहेब यांचे प्रेम मला लाभले आहे, आशीर्वाद लाभला आहे. माझ्या मनात, माझ्या तोंडात कोणाबद्दलही वाईट शब्द आलेला नाही. येणारही नाही. मातोश्रीबद्दल एकही वाईट शब्द जाणार नाही.

## चहापानावरील बहिष्कारावरून देवेंद्र फडणवीसांचा महाविकास आघाडीला टोला



**मुंबई** : राज्याचे पावसाळी अधिवेशन उद्यापासून (दिनांक 20 जून) सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीने पत्रकार परिषद घेत महायुती सरकारवर टीका केली आहे. तसेच त्यांनी याहीवेळी चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला आहे. त्यानंतर महायुतीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टोलेबाजी केली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याचे पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. तीन आठवड्यांचे पूर्ण अधिवेशन प्रस्तावित करण्यात आले आहे. यातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सुटावेत या दृष्टीने सकारात्मक चर्चा आणि त्यावर सरकारच्या वतीने योग्य उपाययोजना अशा पद्धतीचे नियोजन करणे हे सरकारी पक्ष म्हणून आम्ही त्याचा प्रयत्न करणार आहोत. आजही आमच्या विरोधी पक्षांनी चहापानावर बहिष्कार टाकला. ते आले असते तर चर्चा झाली असती. पण त्या ऐवजी त्यांनी आम्हाला 6 पानांचे पत्र दिले आहे. यावेळी पत्रावर सह्या दिसत आहेत. तुम्ही पाहिले तर लक्षात येईल की त्यांनी आधीच सगळ्यांच्या सह्या घेतल्या आहेत आणि त्यानंतर 6 पानांचे पत्र जोडले आहे. हरकत नाही.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपण जर हे पत्र पाहिले, तर लक्षात येईल की हे पत्र एआयच्या मदतीने तयार केले आहे. म्हणजे पत्रही तयार करण्यासाठी आता विषय राहिले नाही, कल्पकता राहिली नाही, किंवा प्रश्नांचे आकलन राहिले नाही. पण एका गोष्टीचा मला आनंद आहे की ते टेक्नॉलॉजीचा उपयोग करत आहेत. आपण सर्वांनीच याचा उपयोग केला पाहिजे. येणारी आव्हाने लक्षात घेत विरोधकांनी आतापासूनच तंत्रज्ञानाचा उपयोग सुरू केला. त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, यावेळी जयंतराव वेळेवर पोहोचले. कारण आपण नाहीत आणि ते पोहोचले. फक्त आता अल निनोला देखील आमच्यासोबत जोडण्याचा प्रयत्न त्यांचा चालू आहे. ही देखील अतिशय आनंदाची गोष्ट आहे. हे सुद्धा त्यांनी चॅटजीपीटीला विचारले असते तर अशा प्रकारचे स्टेटमेंट त्यांनी केले नसते. आपण पाहिले असेल की भासकरराव अलीकडच्या काळात खूप रागवतात. कालच बघितले असेल की आपले मिलिंद नार्वेकर यांनी 2-4 वेळा हॉर्न वाजवल्यानंतर भासकररावांनी त्यांचेच ऑपरेशन तुडवा करून टाकले.

एकूणच या पत्रकार परिषदेत कोणताही नवा विषय हा विरोधक मांडू शकले नाहीत. त्यांच्या पत्रातही एक पॅराग्राफ असा आहे तो पॅराग्राफ आधीपासून तोच आहे. म्हणजे त्यावर चर्चा झाली, कारवाई झाली तरी ते अजूनही तेच टाकतात. कारण लोकांना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अपेक्षित असे मुद्दे हे विरोधकांना अवगतच नाहीत. आता त्यांनी कर्जमाफीच्या संदर्भात सुतोवाच केला आहे. मी आधी एक गोष्ट स्पष्ट करतो की समोर कोणत्याही निवडणुका नसताना आम्ही कर्जमाफी केली आहे. केवळ विधानसभाच नाही, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकलेलो आहोत. आमच्यासाठी कर्जमाफी राजकीय विषय नाही. आमच्यासाठी कर्जमाफी ही शेतकऱ्यांसाठी आपल्याला आमचा शेतकरी जगला पाहिजे, शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घेण्याची ताकद आली पाहिजे, अशा दृष्टीने आम्ही त्याकडे पाहतो.

## सरकारची कर्जमाफी फसवी, शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा : महाविकास आघाडीची मागणी

**मुंबई** : राज्य सरकारच्या अपयशी कारभाराविरोधात आणि जनतेच्या प्रश्नांबाबत सरकारच्या असंवेदनशील भूमिकेचा निषेध म्हणून महाविकास आघाडीने विधानमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याची घोषणा आज पत्रकार परिषदेत करण्यात आली.

महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी राज्यातील गंभीर प्रश्नांकडे सरकारचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. राज्यात दुष्काळ,शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, वाढते अमली पदार्थांचे जाळे यांसारख्या अनेक प्रश्नांवर सरकारकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याची टीका महाविकास आघाडीने केली.

राज्यावर दुष्काळाचे संकट आहे. पेरण्या लांबला आहेत, शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहे. सरकारने सुका दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी पत्रकार परिषदेत केली. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतकऱ्यांना अटी शर्तीमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करावा अशी मागणी महाविकास आघाडीने यावेळी केली.

विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी, हे सरकार ५६ टक्के कमिशन सरकार असल्याची टीका केली. राज्यात कंत्राटदारांनी अधिवेशन घेऊन कामांची बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कमिशन द्यावे लागत असल्याचे सांगितले. कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीत कपात झाली असून अनेक विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे अशी टीका सतेज पाटील यांनी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ जून २०२६


## आदिवासी शक्ति सेना गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** आदिवासी नेते स्व. रमेश भाऊ बांगारे यांच्या वाढदिवसानिमित्त अनुसूचित जाती-जमातीतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.हा कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेवगेडांग फणसवडी येथे पार पडला. यावेळी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या सामाजिक उपक्रमासाठी आदिवासी शक्ती सेना ता इगतपुरी युवा अध्यक्ष सोमनाथ रमेशभाऊ बांगारे, संपर्क प्रमुख मुकेश जाधव, गणेश लहामटे, राहुल जाधव, शांताराम बांगरे,सोमा वारघडे, वैभव लांडगे, रितेश बांगारे यांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल उपस्थित ग्रामस्थ व पालकांनी आदिवासी शक्ती सेना कार्याचे कौतुक केले.

## प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात संपन्न





**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा व वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालय मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. प्रसंगी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री शैलेंद्र पाटील सर व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री पी एस ढमाले सर यांनी विविध योगासनाचे प्रात्यक्षिक दाखव विद्यार्थ्यांना व शिक्षकांना करून दाखवले.

यानंतर काही शिक्षकांनी विविध योगासनाचे प्रात्यक्षिक व महत्त्व विद्यार्थ्यांना समजून सांगून विद्यार्थ्यांकडून ही कृती करून घेतली. या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी. शिक्षक वृंद कर्मचारी यांची उपस्थिती होती..

## कंटेकुर येथील जिल्हा परिषद शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात संपन्न...



**मुरूम, ता. उमरगा, ता. २१ (प्रतिनिधी) :** कंटेकुर, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत रविवारी (ता.२१) रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक स्वास्थ्यासाठी योगाचे महत्त्व पटवून देणारा हा कार्यक्रम शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी सरपंच विजयाताई जमादार, मुख्याध्यापक नागेंद्र समन, राम कलबुर्गे, पांडुरंग धुमाळ, महादेव गायकवाड, वसंत कुंभार आदींची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून योग ही भारताची प्राचीन देणगी असून ती आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असायला हवी, असे प्रतिपादन केले.विद्यार्थ्यांकडून योगासने आणि प्राणायामाचे सादरीकरण योग शिक्षक विजयकुमार कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, वज्रासन, भुजंगासन, त्रिकोणासन व पद्मासन यासारख्या विविध आसनांचे प्रात्यक्षिक दाखवले. तसेच प्राणायामाचे प्रकार करून दाखवत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. योगामुळे एकाग्रता वाढते, ताणव कमी होतो आणि शरीर निरोगी राहते, याची माहिती यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी यावेळी योगविषयक घोषवाक्ये सादर करत योगाच्या प्रसाराचा संदेश दिला. केवळ आजचा दिवसच नव्हे, तर नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन शिक्षकांनी केले. कार्यक्रमाचा समारोप सर्वांनी सामूहिक योगाभ्यास आणि योग प्रतिज्ञा घेऊन केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक लक्ष्मण येवते, लतिफ लदाफ, लक्ष्मीबाई शिकारे, चित्ररेखा दंडे, तनुजा गाढवे आदींनी परिश्रम घेतले. लक्ष्मीकांत पटणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या उपक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्मठतेच्या बेड्या

कर्मठतेच्या बेड्यांनी, विचारांना जखडले,
ज्ञानाच्या सूर्याला त्यांनी, अंधारातच ढकलले.

तक्षशिलेच्या दारी जिथे, विद्वत्तेचे दीप जळाले,
कर्मठतेच्या वादळाने तिथे, एकेक करून विझवले.

नालंदेच्या ग्रंथसंपदेचा, जगभर गाजला होता नाद,
संकीर्णतेच्या आगीत झाला, त्या वैभवाचा अवसाद.

प्रश्न विचारणाऱ्यांना त्यांनी, पापी म्हणून ठरविले,
विवेकाच्या प्रत्येक अंकुराला, निर्दयपणे तुडवले.

जात, धर्म, कर्मकांडांच्या, उभ्या केल्या भिंती,
माणुसकीच्या विस्तीर्ण आभाळाला, लावली त्यांनी बंदी.

सुजलाम सुफलाम भूमी ही, ज्ञानाची होती खाण,
कर्मठतेच्या अतिरेकामुळे, हरपला तिचा स्वाभिमान.

जिथे विज्ञान फुलायचे, तिथे अंधश्रद्धा रुजली,
प्रगतीच्या प्रत्येक पावलाला, मागासलेपणाची साखळी जडली.

विद्रोहाची मशाल घेऊन, आता पुढे चालू या,
प्रश्न, विवेक, समता यांच्या, वाटेवरती जाऊ या.

तक्षशिला-नालंदेचे स्वप्न, पुन्हा नव्याने पेटवू या,
कर्मठतेच्या राखेतून, ज्ञानयुग पुन्हा घडवू या.

देश उभा राहतो, विचारांच्या सामर्थ्यावर,
आणि देश कोसळतो नेहमी, अंधभक्तीच्या भारावर



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ जून २०२६


## हरीणदादा

हरीणदादा हरीणदादा
पाय तुझे लांब लांब
उड्या मारीत धावतोस
थोडातरी थांब

हरीणदादा हरीणदादा
तीक्ष्ण तुझे कान
दूरवरचा आवाज
ऐकायला येते छान

हरीणदादा हरीणदादा
तपकिरी तुझा रंग
डोईवर दोन शिंगे
काटक व चपळ अंग

हरीणदादा हरीणदादा
डोळे तुझे छान
भुकेल्या पोटी गाठतो
हिरवे हिरवे रान

हरीणदादा हरीणदादा
कळपात तू राहतोस
मान उंच करून
सभोताल पाहतोस



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## हेच पुरुषार्थ आहे का ?

रूढी प्रथेच्या बंधनात,
बांधून का बरे ठेवता ?
स्त्री जातीच्या शक्तीला,
तुम्ही का असे घाबरता ?

साखळदंडात कोंडून,
जखडून ठेवले स्त्रीला.
काय दोष होता तिचा,
कोंडून ठेवले नारीला.

स्त्रीला कोंडणे म्हणजे,
हेच पुरुषार्थ आहे का ?
साखळदंडात तुमचे,
पुरुषार्थ गहाण आहे.

येईल वेळ अशी ही,
साखळदंड तुटतील.
नको करू अन्याय,
तुलाही गुरु भेटतील.

कोंडून स्त्री शक्तीला,
प्रश्न तुमचे सुटतील का ?
स्त्रीचे करून बेहाल,
तुम्ही कसे राहता खुशाल ?



**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

# स्मार्ट मिटरची सक्ती थांबवा, बसव प्रतिष्ठानचे मुख्यमंत्र्यांना पत्र, अन्यथा आंदोलन..



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** लोहारा तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात महावितरण मंडळाकडून सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटरची सक्ती केली जात आहे, मुरूम शहरात अनेक ठिकाणी ग्राहकांच्या समंतीविना स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत तर अचलेर येथे बहुतांश वीज ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसवण्यात आले असून आज ते इलेक्ट्रिक मीटर पेक्षा अधिक बिल वसूल करणारी स्मार्ट मीटरचा शिकार बनले आहेत. या संदर्भात डॉ. रामलिंग पुराणे समाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठान यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन उमरगा-लोहारा तालुक्यातील स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती तात्काळ थांबवण्याची विनंती केली आहे अन्यथा दि. १५ जुलै पासुन मुरूम येथील महावितरण कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन छेडण्याचा ईशारा देण्यात आला आहे.उमरगा-लोहारा तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात स्मार्ट मीटर सक्तीने बसवले जात आहेत तर काही ठिकाणी बसवण्यात आले आहेत. इलेक्ट्रिक मीटर सुरळीतपणे चालू असताना स्मार्ट मिटरची सक्ती का? उमरगा लोहारा तालुक्यातील नागरिकांची आर्थिक परिस्थिती हालाकीचे आहे, आजही रोजी रोटी साठी त्यांना दररोज संघर्ष करावा लागतो, दिवसभर काबाड कष्ट केल्यानंतर तेंव्हा दिवसभराचा रोजगार मिळतो आणि त्याच रोजगारातून त्यांना आपल्या पाल्याचा शिक्षण खर्च, कुटुंबाचा खर्च भागवून संसाराचा गाडा चालवावे लागते, म्हणजे तालुक्यातील बहुतांश भाग शेतीवर अवलंबून आहे म्हणजे शेतकरी आणि शेतमजूर असलेल्या या भागात स्मार्ट मीटरची सक्ती का..? या भागातील सर्वसामान्य नागरिकांना स्मार्ट मीटरचा खर्च पेलणारा नाही आणि जरी सक्तीने बसवण्यात आले तर पुन्हा आपण त्यांना प्रकाशातुन अंधाराकडे नेण्याचा घाट घालत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे, चिमणी लावून प्रकाश होईल मात्र सरकारने घासलेट (रॉकेल) पण बंद केले आहे. इलेक्ट्रिक मीटरचा बिल सर्वसामान्य नागरिक थकबाकी न ठेवता इमानदारीने जमा करतात आज त्याच ग्राहकांना स्मार्ट मीटर सक्ती का..? आजही या भागात नागरिकांना साधा मोबाईल वापरता येत नाही ते स्मार्ट मीटर कसे वापरतील..? अनेक ठिकाणी आपण खाजगीकरण केले आहे मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात प्रकाश देणाऱ्या भागात खाजगीकरण करून त्यांचे मरण करू नका ही विनंती. तालुक्यातील स्मार्ट मीटर सक्ती बाबत निर्णय माघार घेण्यासाठी आपण सकारात्मक विचार करून सर्व सामान्य नागरिकांचे जीवन सुकर कराल ही अपेक्षा. खालील मागण्यावर विचार व्हावा ही विनंती.मागण्या -१) उमरगा-लोहारा तालुक्यातील शहरी-ग्रामीण भागातील स्मार्ट मीटर सक्ती तात्काळ थांबवावी.२) ज्याठिकाणी स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत त्याठिकाणचे स्मार्ट मीटर तात्काळ काढण्यात यावे.३) इलेक्ट्रिक मीटर बिलाची सरासरी रक्कम आणि स्मार्ट मीटरने वसूल केलेली बिलाची रक्कम तफावत तात्काळ वीज ग्राहकांना परत करण्यात यावे. ४) नागरिकांच्या समंतीशिवाय स्मार्ट मीटर बसवण्यात येऊ नये. ५) इलेक्ट्रिक मीटर मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास त्याच मीटरची दुरुस्ती करून पूर्वरत बसवण्यात यावे. किंवा नव्याने इलेक्ट्रिक मीटरच बसवण्यात यावे. वरील मागण्या संदर्भात सकारात्मक विचार करून जनसामान्य नागरिकांना न्याय देऊन कायम प्रकाशात ठेवाल ही अपेक्षा. अन्यथा १५ जुलै २०२६ पासुन मुरूम येथील महावितरण कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, आंदोलना दरम्यान होणाऱ्या परिणामास शासन जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.असे निवेदनात म्हंटले आहे.

*उमरगा-लोहारा तालुक्यातील शहरी, ग्रामीण भागात स्मार्ट मीटर सक्ती केली जात आहे, काही ठिकाणी बसवण्यात आले आहेत,आपला भाग शेतीवर अवलंबून असून या भागातील सर्वसामान्य नागरिकांना स्मार्ट मीटर परवडण्या सारखे नाही, आणि त्याचे परिणाम बहुतांश ठिकाणाहून सामोरे येत आहेत, सद्याचे सरकारचे धोरण पाहता खाजगीकरणावर अधिक भर दिसते त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे मात्र यात मरण होणार आहे, त्यामुळे आम्ही सरकारला स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती तात्काळ थांबवण्यात यावे अशी विनंती केली आहे अन्यथा आमरण उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, सरकारने नागरिकांचे हिताच्या ठिकाणी तर खाजगीकरण आणू नये अन्यथा जनता पुन्हा अंधारात जाईल, आमच्या मागण्यावर सरकार सकारात्मक विचार करेल. - **डॉ. रामलिंग पुराणे,** समाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठान*


## पोलीस स्टेशन जिंतूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर)** पोलीस स्टेशन येथे रविवारी योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. पोलीस निरीक्षक रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात पोलीस अधिकारी, कर्मचारी व होमगार्ड यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.पोलीस स्टेशनच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात योग शिक्षक तथा पत्रकार सचिन रायपत्रीवार यांनी उपस्थितांना योगाचे महत्त्व, त्याचे आरोग्यदायी फायदे आणि दैनंदिन जीवनातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यास केल्याने शरीराचे स्नायू बळकट होतात, मन एकाग्र राहते तसेच तणावमुक्त जीवन जगण्यास मदत मिळते, असे त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी सचिन रायपत्रीवार व राम रेहाटे यांनी पोलिस कर्मचाऱ्यांना कपालभाती, अनुलोम-विलोम, ध्यान मुद्रा यांसारख्या प्राणायामांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच वृक्षासन, ताडासन, शशांकासन आदी विविध योगासनांची माहिती देत त्यांचे आरोग्यदायी फायदेही समजावून सांगितले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगासनांचा प्रत्यक्ष सराव करून योग दिन साजरा केला.कार्यक्रमास सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) चव्हाण, महिपले, पोलीस उपनिरीक्षक (PSI) मुजगुले, पोलीस कर्मचारी तसेच होमगार्ड मोठ्या संख्येने उपस्थित होते. योग दिनाच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमित शेवळकर तसेच पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे पोलीस दलामध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**
**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ जून २०२६

# एकल महिलांच्या संघर्षाला न्याय कधी? - सन्मान, सुरक्षा आणि पुनर्वसनाची सामूहिक जबाबदारी

दरवर्षी २३ जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून पाळला जातो. या दिवसाचा उद्देश केवळ विधवा महिलांच्या समस्यांकडे लक्ष वेधणे नाही, तर समाजातील सर्व प्रकारच्या विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, निराधार आणि एकल महिलांच्या अस्तित्व, सन्मान आणि हक्कांबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे.आजही समाजातील अनेक एकल महिलांचे जीवन हे संघर्ष, उपेक्षा, असुरक्षितता आणि अन्याय यांचे प्रतीक बनले आहे. महिला सक्षमीकरणाच्या घोषणा होत असताना लाखो एकल महिला आणि त्यांची मुले मूलभूत हक्कांपासून वंचित आहेत. त्यामुळे जागतिक विधवा दिन हा उत्सव नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे.एकल महिला कोण?समाजात "एकल महिला" या संज्ञेत खालील महिलांचा समावेश होतो :विधवा महिलापरित्यक्ता महिलाघटस्फोटित महिलाअविवाहित वयस्क महिलानिराधार महिलापती बेपत्ता असलेल्या महिलाएकल माताया सर्व महिलांच्या समस्या वेगवेगळ्या असल्या तरी त्यांचा मूळ प्रश्न एकच आहे — आर्थिक, सामाजिक आणि भावनिक आधाराचा अभाव.एकल महिलांची दयनीय वास्तवस्थिती१. आर्थिक असुरक्षितताबहुसंख्य एकल महिलांकडे उत्पन्नाचे स्थिर साधन नसते. पतीच्या निधनानंतर किंवा विभक्त झाल्यानंतर कुटुंबाचा सर्व आर्थिक भार त्यांच्यावर येतो.नियमित रोजगार नसणेकमी मजुरीबँक कर्ज न मिळणेउद्योजकतेसाठी भांडवलाचा अभावयामुळे अनेक महिला गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून राहतात.२. मालमत्ता हक्कांपासून वंचितताकायद्याने हक्क असतानाही अनेक महिलांना वडिलोपार्जित मालमत्ता किंवा पतीच्या मालमत्तेतील हक्क मिळत नाहीत.जमीन नावावर नसणेवारसा हक्क नाकारणेभावंडे किंवा नातेवाईकांकडून विरोधदीर्घकालीन न्यायालयीन वादयामुळे महिलांची आर्थिक सुरक्षितता धोक्यात येते.३. पोटगी आणि न्यायालयीन दिरंगाईघटस्फोटित आणि परित्यक्ता महिलांच्या बाबतीत पोटगीची प्रकरणे अनेक वर्षे न्यायालयात प्रलंबित राहतात.न्यायालयीन खर्चदीर्घकालीन तारखानिर्णयाची विलंबित अंमलबजावणीपरिणामी महिला आणि त्यांची मुले आर्थिक संकटात सापडतात.४. सामाजिक बहिष्कार आणि मानसिक ताणआजही अनेक ठिकाणी विधवा किंवा परित्यक्ता महिलांकडे सहानुभूतीपेक्षा संशयाने पाहिले जाते.सामाजिक कार्यक्रमांपासून दूर ठेवणेअपमानास्पद वागणूकमानसिक एकटेपणानैराश्य आणि ताणही अदृश्य वेदना अनेकदा आर्थिक समस्यांपेक्षाही मोठी असते.एकल महिलांच्या पाल्यांची वेदनाएकल महिलांच्या मुलांना अनेकदा "अदृश्य पीडित" मानले जाते.त्यांच्यासमोरील प्रमुख समस्याशाळा व महाविद्यालयाची फीशैक्षणिक साहित्याचा खर्चडिजिटल साधनांचा अभावसामाजिक कलंकभावनिक आधाराची कमतरताकाही मुले आर्थिक कारणांमुळे शिक्षण सोडतात, तर काहींना उच्च शिक्षणाची संधीच मिळत नाही.खऱ्या पुनर्वसनासाठी शासनाने काय करावे?१. स्वतंत्र एकल महिला धोरणराज्यस्तरावर स्वतंत्र "एकल महिला सक्षमीकरण व पुनर्वसन धोरण" लागू करणे आवश्यक आहे.२. एकल महिला विकास महामंडळविशेष महामंडळ स्थापन करून :कर्जअनुदानउद्योजकताकौशल्य विकासयासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करावा.३. मासिक जीवननिर्वाह भत्तामहागाईनुसार नियमित आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे.४. मालमत्ता हक्क संरक्षण प्राधिकरणवारसा हक्क आणि मालमत्ता वाद जलद निकाली काढण्यासाठी विशेष यंत्रणा उभी करावी.५. फास्ट ट्रॅक कौटुंबिक न्यायालयेपोटगी, निर्वाहभत्ता आणि कौटुंबिक वाद ९० ते १८० दिवसांत निकाली काढण्याची व्यवस्था असावी.६. पुनर्विवाह प्रोत्साहनपुनर्विवाह हा वैयक्तिक निर्णय असला तरी इच्छुक महिलांसाठी :समुपदेशनसामाजिक आधारआर्थिक प्रोत्साहनयोजना उपलब्ध करून द्याव्यात.७. पाल्यांसाठी विशेष शिक्षण मिशनमोफत शिक्षणशिष्यवृत्तीवसतिगृहस्पर्धा परीक्षा प्रशिक्षणडिजिटल शिक्षण सहाय्ययांचा समावेश असलेले स्वतंत्र धोरण आवश्यक आहे.प्रशासनाने काय करावे?प्रत्येक जिल्ह्यात :एकल महिला सहायता केंद्रमोफत कायदेशीर मदतमानसिक समुपदेशनरोजगार मार्गदर्शनउपलब्ध करावे.प्रत्येक ग्रामपंचायतीत :एकल महिलांची नोंदणीयोजना लाभ पडताळणीवार्षिक सामाजिक लेखापरीक्षणराबवावे.समाज आणि नागरिकांची भूमिकाशासन कितीही योजना आणेल, पण समाजाचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय खरे पुनर्वसन होणार नाही.समाजाने :पुनर्विवाहाला सकारात्मक दृष्टीकोन द्यावासामाजिक भेदभाव थांबवावामुलांच्या शिक्षणासाठी मदत करावीसन्मानाने वागणूक द्यावीस्वयंसेवी संस्थांनी :कायदेशीर मदतकौशल्य प्रशिक्षणसमुपदेशनशैक्षणिक सहाय्यपुरवावे.सामाजिक न्यायाचा प्रश्नएकल महिलांचा प्रश्न हा केवळ महिला कल्याणाचा विषय नाही. तो मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, संविधानिक समानता आणि मूलभूत मानवी हक्कांचा प्रश्न आहे.ज्या समाजात लाखो महिलांना सन्मानाने जगण्याची संधी नाही, त्या समाजाच्या विकासाच्या दाव्यांना पूर्णता येऊ शकत नाही.निष्कर्षजागतिक विधवा / एकल महिला दिन हा केवळ स्मरणदिन नाही; तो समाजाला जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित आणि एकल महिलांना दया नव्हे, तर संधी, सुरक्षा, सन्मान आणि समान हक्क हवे आहेत.शासनाने सक्षम धोरणे आखावीत, प्रशासनाने त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि समाजाने स्वीकार व आधार द्यावा. तेव्हाच एकल महिला आणि त्यांच्या पाल्यांचे जीवन खऱ्या अर्थाने बदलू शकेल."एकल महिलांचे सक्षमीकरण म्हणजे केवळ एका व्यक्तीचे पुनर्वसन नव्हे; तर एका कुटुंबाचे, एका पिढीचे आणि अखेर संपूर्ण समाजाचे पुनर्निर्माण आहे.“



**भगवंत पाळवदे,**
**समाजसेवक अंबाजोगाई (बीड )**

# श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल भारतमाता कॉलनी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** श्री तिरुपती शिक्षण संस्था संचलित श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल, भारतमाता नगर,बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक 21 जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून मुख्य योग शिक्षिका श्रीमती संपदा देशपांडे मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम तसेच योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व सांगितले. त्या 'अष्टांग योगा क्लास 'च्या प्रशिक्षक आहेत. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री किरण पाटील साहेब (भैय्यासाहेब) उपस्थित होते. श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय श्री राजेश पाटील साहेब (दादासाहेब) यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.गावंडे सर श्रीमती पवार मॅडम, श्रीमती वानखेडे मॅडम, श्रीमती बोराडे मॅडम, श्री.भोसले सर, श्री.शिंदे सर, श्री.मनगटे सर, श्री.खैरे सर, श्री पडवाल सर , श्री घुले सर, श्री.गायकवाड सर, श्री जुंबडे सर, श्री.धनवे सर उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध योगासने सादर केली. योगामुळे शरीर सुदृढ, मन शांत आणि जीवन निरोगी राहते, असा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन श्री भोसले सर यांनी केले व आभार श्री घुले सर यांनी मानले.

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
प्रवेश सुरू
▪ बी.ए. मराठी व उर्दु ▪ एम.ए. ▪ एम.कॉम.
▪ बी.लिब. ▪ एम.लिब. ▪ DMLT
▪ फिजीओथेरपी ▪ रेडीओलॉजी ▪ OT टेक्नीशीएन
▪ MSW ▪ M.B.A. ▪ ECG X-Ray
▪ डिप्लोमा ऑप्थोमेट्री ▪ इलेक्ट्रीशिएन ▪ BEMS
▪ नर्सिंग ▪ डी.फार्मसी ▪ ECG टेक्नीशीएन
४ थी पास ते १२ वी नापास वांना सहा महिन्यात १२ वी पास (पूर्वतयारी)
* संपर्क *
प्राचार्य डॉ. हसन इनामदार - 9405109103 / 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ जून २०२६


## इंजिनियरने डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवासी निवारा केला जमीनदोस्त



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** शहरातील जालना मार्गावरील बलसा फाटा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उभारण्यात आलेला प्रवासी निवारा पाडण्यात आल्याच्या घटनेमुळे आंबेडकरी अनुयायी व नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. संबंधित यंत्रणा व इंजिनियरने कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच नगरपालिका आणि पोलिस प्रशासनाची आवश्यक परवानगी न घेता हा प्रवासी निवारा जमीनदोस्त केल्याचा आरोप होत आहे. या प्रकारामुळे आंबेडकरी अनुयायांच्या भावना दुखावल्या गेल्या असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असलेला हा प्रवासी निवारा अनेक वर्षांपासून प्रवाशांसाठी आधार ठरत होता. उन्हाळा, पावसाळा तसेच विविध ऋतूंमध्ये नागरिक या निवाऱ्याचा वापर करत होते. मात्र अचानकपणे हा निवारा पाडण्यात आल्याने परिसरातील नागरिक व दलीत सामाजिक कार्यकृत्ये आश्चर्यचकित पेटून उठले आहेत.निवारा पाडण्यापूर्वी संबंधित विभागाने नगरपालिका प्रशासनाची मंजुरी घेतली होती का ? तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलिस प्रशासनाला माहिती देण्यात आली होती का? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

*संबंधित विभागाची हुकुमशाहीसार्वजनिक मालमत्ता अथवा समाजपुरुषांच्या नावाने उभारलेल्या वास्तूंवर कारवाई करताना नियमानुसार प्रक्रिया राबविणे आवश्यक असते. मात्र या प्रकरणात नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप होत आहे.आंबेडकरी संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशाच्या संविधानाचे शिल्पकार असून त्यांच्या नावाशी निगडित असलेल्या वास्तूचे पाडकाम करताना प्रशासनाने संवेदनशीलता दाखवणे आवश्यक होते, असे मत मा.नगरसेवक चंद्रकांत बहिरट यांनी व्यक्त करत आपला रोष व्यक्त केला असून आज सोमवारी या बाबत पोलिस स्टेशन,नगर परिषद प्रशासन व सार्वजनिक बांधकाम यांना निवेदन सादर करून संबंधित यंत्रणेवर गुन्हे दाखल करून चौकशीची मागणी करणार असल्याची चर्चा जोर धरत आहे .व डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाने प्रवासी निवारा तत्काळ उभा करन्याची मागणीही केली जाणार असल्याची माहिती चंद्रकांत बहिरट यांनी सागितले.*

## जिजामाता विद्यालय व डॉ. सुभाषचंद्र राठी बालक विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिंतूर येथील डॉ. सुभाषचंद्र राठी बालक विद्यामंदिर व जिजामाता विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २१ जून) विद्यालयाच्या प्रांगणात विविध योगासने, प्राणायाम आणि जनजागृतीपर उपक्रमांनी योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुभाषचंद्र राठी बालक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक गजाननजी तिखे होते. तर आयोजक जिजामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक एम. पी. कदम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी डॉ. पंडितजी दराडे, डॉ. बी. के. पाचरणे, योग शिक्षक व पत्रकार सचिन रायपत्रीवार, पुरुषोत्तम अंभोरे, तसेच योग शिक्षक रवीजी आढे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, आरोग्यदायी जीवनशैली आणि नियमित योगाभ्यासाचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. पंडितजी दराडे यांनी योगामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य कसे जपले जाते यावर भाष्य केले, तर डॉ. बी. के. पाचरणे यांनी दैनंदिन जीवनात योगाचे असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. योग शिक्षक सचिन रायपत्रीवार व पुरुषोत्तम अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, पद्मासन, अनुलोम-विलोम, कपालभाती यांसह विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागामुळे संपूर्ण परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला.यावेळी विद्यार्थ्यांनी कमळाकृती योग प्रतिकृती तसेच योग दिनाशी संबंधित आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि योगाबद्दलची जागरूकता यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही. एस. गिते यांनी केले, तर सौ. प्रतिभा साबळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## १० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

# D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903